# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२०-२२** **दिनांक २३/०७/२०२२**

## पोलीस आयुक्तालय स्तरावरील शांतता समितीची पहिली बैठक सन्माननीय सदस्यांच्या उपस्थितीत झाली संपन्न.

जातीय तणावाच्या परिस्थितीमध्ये कायदा व सुव्यवस्था, जातीय सलोखा व शांतता राखण्याच्या दृष्टीने व पोलीस स्तरावर तसेच जातीय तणावाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या इतर ठिकाणी शांतता समिती स्थापन करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक जारी करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात जातीय तणावाच्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थ, जातीय सलोखा व शांतता राखण्याच्या दृष्टीने पोलीस आयुक्तालय स्तरावर शांतता समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीमध्ये कार्यक्षेत्रातील मा. खासदार, आमदार, महापौर व काहि नगरसेवक असे स्थायी सदस्य असून सर्व धर्माच्या मान्यवर व्यक्ती, सामाजिक संघटनांचे सदस्य, वकील/डॉक्टर/सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, एनजीओचे सदस्य, व्यापारी, उद्योजक, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती असे अस्थायी सदस्य असणार आहेत. शांतता समितीचे अध्यक्ष म्हणून पोलीस आयुक्त व सचिव म्हणून पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) असे कामकाज पाहणार आहेत.

दिनांक २३/०७/२०२२ रोजी पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये संवाद हॉलमध्ये झालेल्या बैठकीमध्ये उपस्थित असलेल्या सर्व धर्माच्या धर्मगुरु यांनी विश्वशांतीचा संदेश देण्याकरिता प्रार्थना म्हटली. तसेच इतर सन्माननीय सदस्य यांनी सर्व जाती-धर्मामध्ये कोणत्याही मुद्यावरुन तेढ व तणावाची परिस्थिाती उद्‌भवू नये याकरिता सर्वांनी एकमेकांच्या धर्म, जाती, परंपरा व श्रध्दास्थानांचा आदर करुन भारताची एकात्मता जपण्याच्या दृष्टीने भुमिका घ्यायला हवी अशा स्वरुपाची अपेक्षा व्यक्त केली. तसेच मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये आतापर्यंत कोणतीही धार्मिक किंवा जातीय तणावाच्या घटनेची पार्श्वभुमी नाही. त्यामुळे भविष्यात देखील कोणत्याही मुद्यावरुन जातीय तणाव निर्माण होवु नये याकरिता सर्वांनी मत व्यक्त केले.

पोलीस आयुक्तालय स्तरावरील सदर शांतता समितीच्या बैठकीमध्ये मा. खासदार श्री राजेंद्र गावीत, मा. आमदार श्रीमती गीता जैन, मा. आमदार श्री राजेंद्र पाटील, मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते, अपर पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक, नगरसेवक श्री धनेश पाटील, श्री. सुरेश खंडेलवाल, श्री. जुबेर अब्दुल्ला इनामदार, सर्व धर्माचे मान्यवर श्री. दयामुर्ती दास, श्री प्रदिप तेंडूलकर, श्री हर्षगोविंद दास, श्री. मनोज शाहसाहेब कोतवाल, श्री मौलाना अख्तर, श्री. फादर पिटर डिकुना,

श्री. सचिन अरविंद बंडे, भदंत किर्तीपीयो नागसेन, श्री. विपुल चिमणलाल शहा, श्री. राजेंद्रसिंग पोपली, सर्व क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती श्री. ॲड. सना देशमुख, श्री. डॉ. माल्कम पेस्टनजी, श्री. डॉ. अजय प्रभाकर संखे, श्री. डॉ. चंद्रकांत नारायण शेट्टी, श्री. प्रदीप दौलत भाटीया, श्री. ताराचंद विकमणी, श्री. सुनिल आत्माराम धापसे, श्री. मंग्लेश्वर सिक्वेरा, श्री. अभय पंडीत, श्री. प्रकाश लिमये, श्री. सुहास बिऱ्हाडे, श्री. मंगेश कराळे तसेच श्री दिलीप ढोले, आयुक्त, मिरा-भाईंदर मनपा, श्री अजिंक्य बगाडे, अति. आयुक्त, वसई-विरार मनपा, पोलीस उप आयुक्त श्री. अमीत काळे, श्री संजयकुमार पाटील, श्री प्रशांत वाघुंडे, श्री विश्वनाथ तळेकर, सहायक आयुक्त, वसई-विरार मनपा, श्री स्वप्निल तांगडे, उपविभागीय दंडाधिकारी, वसई, श्रीमती स्मिता गुरव, नायब तहसिलदार मिरा-भाईंदर असे मान्यवर उपस्थित होते.








मिरा भाईंदर वसई विरार
पोलीस आयुक्तालय
शांतता समिती बैठक